कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/कविवि/सूकेकेस्मृसंस/२०२१–२२/२४२३
दि. १८/०१/२०२१

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित सूरश्री केसरबाई केरकर संगीत समारोह नुकताच राजीव गांधी कला मंदिर, फोंडा येथे संपन्न झाला. या महोत्सवात स्थानीक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील गायक व वादक कलाकारांना निमंत्रित करण्यात आले होते. सूरश्री केसरबाई केरकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्या संबंधीचा हा समारोह कला अकादमी मागच्या ४० वर्षापासून आयोजित करत आहे. यंदाच्या या समारोहाचे उद्घाटन कला अकादमीचे सदस्य सचिव श्री विनेश आर्लेकर यांच्याहस्ते समई प्रज्वलीत करुन करण्यात आले. या प्रसंगी कला अकादमीची प्रशासकीय संचालीका श्रीमती फ्रांस्किना ओलीव्हेरा, दक्षीण गोवा ग्रामीण विकास यंत्रणेचे श्री. प्रविण बरड कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागाचे प्रभारी संचालक श्री. प्रेमानंद आमोणकर, राजीव गांधी कला मंदिराच्या सदस्य सचिव सौ. स्वाती दळवी व कला अकादमीचे कार्यक्रम व विकास अधीकारी श्री. प्रदीप गांवकर उपस्थित होते.

उद्घाटन सत्राला जोडून स्थानीक प्रज्ञावंत युवा गायिका रितिष्का वेर्णेकर यांचे शास्त्रीय गायन झाले. त्यांनी राग “श्री” सादर करुन रसिकांची मने जिंकली. त्यानंतर बरोडा स्थित पं. दीपक क्षीरसागर यांनी शास्त्रीय स्लाइड गिटार वादनाची मैफल सादर करुन चोखंदळ रसिकांना चांगलेच रिझवले. त्यांनी राग “गावती” सादर करुन स्लाइड गिटार वादनातील बारकावे रसिकांना उलघडून दाखविले. या सत्राचा समारोप प्रसिध्द गायिका आरती अंकलीकर टिकेकर यांच्या शास्त्रीय गायनाच्या मैफलीने झाला. त्यांनी राग “झिंझोटी” सादर करुन या समारोहात रंगत भरली.

दुस-या दिवशीच्या सकाळच्या सत्रात मुंबई स्थित धनंजय हेगडे यानी प्रभावीपणे "रामकली" रागाची माडणी करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर शाकिर खान, पुणे यांचे सतारवादन झाले. त्यांनी "शुध्द सारंग" सादर केला.

दुस-या दिवशीच्या सायंकाळच्या सत्राची सुरवात गोमंतकीय बासरी वादक श्री. सोनिक वेलींकर यांच्या बासरी वादनाने झाली त्यांनी राग "गावती" सादर करुन आपली निपुणता सिध्द करुन दाखवतानाच रसिकांची चांगलीच मने जिंकली. त्यानंतर नवी दिल्ली स्थित प्रशांत मल्लीक व निशांत मल्लीक या बंधूनी संमेलनात धृपद गायनाची मैफल सादर केली. धृपद गायनाची परंपरा लोप पावत असतानाच मल्लीक बंधूने धृपद गायनात स्वताचा असा ठसा उमटविला असल्याचे त्यांची मैफल ऐकताना जाणवत होते. त्यांनी या संमेलनात राग "श्री" प्रभाविपणे आळवून रसिकप्रेक्षकांना धृपद गायनात चांगलेच रमविले. मल्लीक ब्रदर्स यांच्या धृपद गायनानंतर संगीता कट्टी कुलकर्णी यांचे शास्त्रीय गायन झाले. त्यांनी राग "यमन" अळवीला. दुस-या दिवशीच्या कार्यक्रमाचा समारोप पं. योगेश साम्सी व यांचे शिष्य स्वप्नील भिसे व चंद्रशेखर गांधी, मुंबई यांच्या तबला ट्रीवोची मैफलीने झाला. त्यांनी "तिन ताल" वाजवून सभागृह तालमय करुन सोडले.

महोत्सवाच्या तिस-या दिवशीच्या सत्राची सुरवात नितेश सावंत यांच्या शास्त्रीय गायनाने झाली. त्यांने राग "भैरव" सादर केला. एक प्रज्ञावंत युवा गायक कलाकार म्हणून नावलोकिक असलेले नितेश सावंत यांनी अत्यंत सुंदररित्या आपली मैफल सादर केली. त्यानंतर कोलकाता येथील प्रख्यात सरोदवादक पं. देबासिश भट्टाचार्या यांनी सरोदवादन सादर करुन लोकाना मंत्रमुग्ध केले. त्यांनी राग "सामंत सारंग" सादर केला.

सायंकाळच्या संत्राची सुरवात श्रीमती मंजिरी असानारे केळकर या प्रथितयश गायिकेच्या शास्त्रीय गायनाच्या सादरीकणाने झाली. त्यांनी राग "गौरी" सादर केला. मंजिरी असानारे केळकर यांच्या गायनानंतर प्रसाद खापर्डे यांच्या शास्त्रीय गायनाची मैफल झाली त्यांनी राग "केदार" आळविला. त्यानंतर धारवाड स्थित ज्योती हेगडे यांचे रुद्रवीणा वादन सादर झाले. त्यांनी राग

“भूपाली” वाजवून सुंदर मैफलीचा आस्वाद घेण्याचे समाधान रसिकप्रेक्षकांना दिले. यंदाच्या सूरश्री केसरबाई केरकर संगीत समारोहाची सांगता कोलकाता येथील ख्यातनाम गायक कलाकार पं. अजोय चक्रवर्ती यांच्या शास्त्रीय गायनाने झाली. त्यांनी राग “मारु बिहाल” सादर करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले.

या समारोहातील वेगवेगळया मैफलीसांठी तबला साथ पं. योगेश साम्सी, ओजस आधिया, दयानिधेश कोसंबे, उदय कुलकर्णी, मयांक बेडेकर, अमर मोपकर, स्वप्निल मांद्रेकर, ऋषिकेश फडके, महेश वझे यांनी केली तर संवादीनी साथ पं. अजय जोगळेकर, राया कोरगांवकर, सुभाष फातार्फेकर, गुरुप्रसाद गांधी, दत्तराज सुर्लकर, प्रसाद गावस, दत्तराज म्हाळशी या कलाकारांची होती. तर मृणाल मोहन उपाध्याय, पं. ज्ञानेश्वर देशमुख यांनी पखवाज साथ केली.

तिनही दिवसांच्या विविध सत्रांचे निवेदन डॉ. साईश देशपांडे व डॉ. रुपा च्यारी यांनी केले.

कोविडची सर्व मार्गदर्शन तत्वे पाळून आयोजित केलेल्या या समारोहासाठी रसिक श्रोत्यानी भरभरुन प्रतिसाद केला.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

सोबतः प्रमुख कलाकारांची छायाचित्रे

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)